




मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा

ही सर्व आयएलआर पुस्तके






































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

“गोष्टींच्या माध्यमातून बहुविध भारताची ओळख.”
- द पायोनिअर


मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
` xxx


इंडिगो सीरिजमध्ये



कुट्टन दुपारची भरपूर झोप घेऊन उठला. त्याची तीन छोटी भावंडं सैरावैरा पळत होती आणि खूपच रोमांचित झाली होती.

काहीतरी मजेदार घडत होतं. किमान त्या तिघांसाठी तरी काहीतरी निश्चितच रोमांचक होतं. ती तिघंही खूप लहान होती आणि कुट्टन थोडा मोठा होत होता. पण त्याला एकदम

मोठ्ठं झाल्यासारखं **वाटत होतं!**



त्याने आळस दिला आणि आपलं शरीर गदागदा हलवलं आणि मोठ्या भावाच्या अविर्भावात ढेंगा टाकत तो त्याच्या लहान भावंडांकडे गेला. त्याने त्याच्या छोट्या भावांसोबत एक फेरफटका मारला.

तेवढ्यात त्याला हिरव्या पानांमध्ये चमकदार आणि पिवळ्या रंगाचं काहीतरी दिसलं. जेव्हा तो सकाळी झोपायला जात होता तेव्हा हे इथे नव्हतं.


त्याच्या एका भावानं घाबरतच कुट्टनला विचारलं, “हे काय आहे? आम्ही असं काहीतरी कधीच पाहिलेलं नाही!”

कुट्टननं स्मितहास्य केलं आणि घसा साफ केला,
“म्याव”.
अर्थातच, मला माहीत आहे! काय पण प्रश्न आहे!



गेल्या वर्षीसुद्धा त्याने अशीच गोष्ट पाहिली होती आणि आई मांजरीनं त्याला समजावून सांगितलं होतं. पण तो सगळं विसरला होता.

किती बावळटपणा झाला हा!



गेल्या वर्षी त्या बाईनं खड्डा खणला होता, त्यात पाणी ओतलं आणि त्यावर जाळी लावली. कुट्टन खूप खोडकर होता, आणि ते त्या बाईला माहीत होतं.

त्यानंतर पानं आली आणि लाल रंगाचं काहीतरी जमिनीतून बाहेर आलं. कुट्टन खूप घाबरला! पण ती बाई आणि तिची मुलगी खूप खुश झाले होते.



कुट्टन विचारात पडला. त्या वेळी ते लाल होतं आणि आता पिवळं आहे, पण ही वस्तू तिच आहे! या वस्तूचं नाव मला का आठवत नाही आहे?

कुट्टनला वाटलं काहीतरी सांगायला हवं. "ठीक आहे. मी काय म्हणतो ते तुम्ही तिघांनी नीट ऐका. या बाईला माती आवडते. दर वर्षी ती माती खणते. त्यात पाणी ओतते. नंतर आपण जेव्हा माती खणायचा प्रयत्न करतो तेव्हा ती आपल्याला हाकलवून लावते."



त्यानंतर ती मातीमध्ये छोटे मणी घालते.
कधी कधी ते पांढऱ्या रंगाचे असतात.
काही वेळा काळे असतात.
आणि नंतर काय होतं?"
"काय?" तीनही पिल्लं मोठ्या आवाजात म्हणाली.

"ही लहानगी हिरवी हिरवी वस्तू या मातीतून बाहेर येते. त्यांना म्हणतात पानं. जसं मला कुट्टन म्हणतात." तो म्हणाला.

"हो, पण ते आम्हाला माहीत आहे." ती पिल्लं म्हणाली. "ती पिवळ्या रंगाची वस्तू काय आहे?"
**प्लीज** सांग की!"

त्याला काही सुचत नव्हतं. पुढे
काय बोलावं ते कळत नव्हतं.
आणि तेवढ्यात त्याला आठवलं.



“आनंद!”, तो म्हणाला.
“आनंद?” पिल्लांनी शंका व्यक्त केली.
“हो, तुम्हाला समजलं नाही का? वाऱ्यावर डोलताना ती किती छान दिसतात. त्या हिरव्या वस्तूंना पाहून आपल्याला आनंद होतो. हो ना?
जेव्हा पानं वर येतात तेव्हा लोकांना खूप आनंद होतो.
म्हणून शेपूट नसलेले लोक आनंदी लोक आणि आनंदी मांजरी पानांनासुद्धा आनंदी करतात.


आणि मग ती आपल्याला
हा छोटा आनंद देतात.




हा आहे पिवळा आनंद. गेल्या वर्षी मी लाल आनंद पाहिला होता. आहे ना सुंदर?”

आता पिल्लांना समजलं. “अरे दे बघा! ते उत्साहाने म्हणाले, “मधमाशांना आणि फुलपाखरांनाही ती आवडत आहेत.”

“नक्कीच”, कुट्टन म्हणाला. “प्रत्येकालाच ती आवडत आहेत.”





“काय आवडत आहे?” कुट्टनच्या मागनं एक म्याव आवाज आला. ती होती आई मांजर.
“आनंद”, एक भावंड उत्तरलं.
“काय? अच्छा, म्हणजे तुला फुल म्हणायचं आहे का!”, आई मांजर हसत म्हणाली.

आपण अदृश्य झालो तर किती बरं होईल, असं कुट्टनला वाटून गेलं! तो खूप खजील झाला होता.
हे फुल आहे!
हे कसं विसरलो मी?

दोन छोट्या भावंडांनी कुट्टनला चिडवलं आणि तिथून निघून गेले. पण तिसरं पिल्लू थांबलं. आणि म्हणालं, “वाईट वाटून नको घेऊस. मला वाटतं आनंद हे चांगलं नाव आहे. खरं तर तू बरोबरच बोललास.” कुट्टनला आता बरं वाटत होतं.

प्रत्येक जण काही वेळा बरोबर असतो. आणि प्रत्येक जण काही वेळा चुकीचा असतो. त्याच्यानुसार फुलं आनंदी असतात.



आणि त्याला स्वतःबद्दल आणि छोट्या भावंडाबद्दल आणि आनंद फुलांबद्दल आनंद वाटत होता आणि तो उड्या मारत होता. आता तो खूप आनंदी होता. त्याला इतका आनंद झाला होता की, त्याला पुन्हा लहान पिल्लू झाल्यासारखं वाटत होतं.



सिरीन कासिम एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भ्रमंती करत असतात. सध्या त्या लंडनमध्ये आहेत. स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीजमध्ये साऊथ एशियन स्टडीजमध्ये एमए करत आहेत. जगाला वाचविण्याचे स्वप्न पाहताना त्या काही ना काही खरडत असतात.

सोनल पानसे या फ्रीलान्स कलाकार आणि लेखिका असून त्या महाराष्ट्रातील नाशिकमध्ये राहतात. त्या विविध प्रकारच्या माध्यमांवर वास्तववादी, काल्पनिक आणि ॲबस्ट्रॅक्ट कलाकृती निर्माण करतात. त्यांच्या कलाकृती भारत, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याची चित्रे लंडन व मुंबईमध्ये प्रदर्शित करण्यात आली आहेत आणि सध्या त्या कादंबरीचे लिखाण करत आहेत.

# KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." – **नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो."
– **चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते"
– **टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" – **पेपरटायगर्स**

प्रथम आवृत्ती वर्ष २०२१
कॉपीराइट © कथा, २०२१, २०२१
मजकूराचा कॉपीराइट ©सुनैना अली
इलस्ट्रेशन कॉपीराइट © कथा
ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6

**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!
कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.
या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.




"आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते!
(विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा)."

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.